**प्रसार माध्यमांसाठी प्रकाशन - मासे जाणून घेऊया पुस्तकाचे अनावरण**

कांदळवन प्रतिष्ठानाने 'मासे जाणून घेऊया' नामक मराठी पुस्तकाचे १९ जुन २०२१ रोजी किनारी आणि सागरी जैवविविधता केंद्र, ऐरोली येथे प्रकाशन केले. या पुस्तकाचे लेखक कै. डॉ. विनय देशमुख आणि त्यांच्या पत्नी डॉ. नंदिनी देशमुख आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद श्री. वीरेन्द्र तिवारी, कार्यकारी संचालक, कांदळवन प्रतिष्ठान आणि अपर प्रधान मुख्य वन संरक्षक, कांदळवन कक्ष यांनी बजावले. या कार्यक्रमास डॉ. मनीषा कायंडे, शिवसेना आमदार; श्रीमती नीनू सोमराज, सहसंचालक, कांदळवन प्रतिष्ठान आणि उपवन संरक्षक, कांदळवन कक्ष; श्री. राजेंद्र मगदूम, सहाय्यक वनसंरक्षक, मुंबई कांदळवन संधारण घटक आणि पुस्तकाच्या लेखिका डॉ. नंदिनी देखमुख उपस्थित होते.

तसेच, या सोहळ्यासाठी डॉ. सुशांत चक्रवर्ती, सी.आय.एफ.इ. संस्थेतील सेवानिवृत्त प्रमुख वैज्ञानिक, श्री. विनोद नाईक, माजी सह आयुक्त, मस्त्य विभाग, डॉ. अनुलक्ष्मी चेलापन, सी.एम.एफ.आर.आय संस्थेतील वरिष्ठ वैज्ञानिक, श्री. सदाशीव राजे, सी.एम.एफ.आर.आय संस्थेतील सेवानिवृत्त प्रमुख वैज्ञानिक आणि कांदळवन कक्ष  व कांदळवन प्रतिष्ठानाचे कर्मचारी उपस्थित होते.

कोविड महामारीचे सर्व नियम पाळून या कार्यक्रमाचे आयोजन केले होते आणि मान्यवर व आमंत्रितांखेरीज बाकी लोकांकरिता या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण कांदळवन प्रतिष्ठानाच्या युट्युब चॅनेल वर केले गेले ज्याची चित्रफीत तेथे उपलब्ध आहे.

श्री. हर्षल कर्वे, सागरी जीवशास्त्रज्ञ, कांदळवन प्रतिष्ठान यांनी या पुस्तकाकरीताचे आवश्यक समंवयन केले तसेच पुस्तकातील चित्रे, संकल्पन, पुनर्वाचन आणि पुस्तक लेखनातही डॉ. नांदिनी देशमुख यांचे सहाय्य केले. श्रीमती धनश्री बगाडे, सागरी जीवशास्त्रज्ञ, कांदळवन प्रतिष्ठान, इतर सागरी संशोधक आणि सागरी माहितगार यांनी या पुस्तकाकरिता मास्यांची छायाचित्रे दिली असून मास्यांची ओळख करण्यात आणि त्यांसबंधीत मजकुराचे पुनर्वाचन करण्यात मदत केली आहे.

हे पुस्तक म्हणजे मास्यांची देशाला विदेशी चलनाचा ओघ वाढवणारा आणि भारतातील बहुतांश जनतेचा प्रोटीनयुक्त अन्नाचा स्रोत म्हणून ओळख मिळवून देण्याचा हा एक प्रयत्न आहे. या पुस्तकात खाण्यायोग्य सागरी मास्यांच्या प्रजातींचे महत्व, त्यांची ओळख, इतर महत्वाची वैज्ञानिक माहिती तसेच त्यांचा संवर्धनाकरिताचे उपायही सांगितले आहेत. हे पुस्तक स्थानिकांना मत्स्य विक्रीविषयीही मार्गदर्शक

ठरेल. यातील शेवटच्या सत्रात मास्यांपासून तयार होणारे विविध खाद्यपदार्थ सांगितले आहेत ज्याद्वारे मासेमार आणि किनारी रहिवास्यांकरिता एक नवीन उपजीविका साधन निर्माण होऊ शकेल.

हे पुस्तक मासेमार आणि किनारी रहिवास्यांसाठी उपयुक्त आहेच तसेच यातील सोप्या भाषेमुळे सामान्य नागरिक, या विषयातील नवशिक्षित, विद्यार्थी, शिक्षक, इ. करीताही तितकेच उपयुक्त आहे. कांदळवन प्रतिष्ठान हे पुस्तक जास्तीत जास्त मासेमार समाज, शाळा, महाविद्यालये, इ. पर्यंत पोचावे याकरिता आग्रही आहे. या पुस्तकाची संगणकीय प्रत कांदळवन प्रतिष्ठानाच्या संकेतस्थळावर लौकरच मोफत वाचनाकरिता उपलब्ध केली जाईल.

**लेखकांविषयी:**

**कै. डॉ. विनय देशमुख** मत्स्य वैज्ञानिक म्हणून चार दशके भारतीय कृषि अनुसंधान परिषद-केन्द्रीय समुद्री मात्स्यिकी अनुसंधान संस्थान या संस्थेत कार्यरत होते. यांचे विषयातील अद्वैत ज्ञान आणि कामाप्रती असणारी निष्ठा ही सर्व पर्यावरणप्रेमी आणि मत्स्य आभासकांमध्ये प्रचलित होती. मस्त्य व्यवसायासंबंधीतील विविध नीती ठरवण्याकरिता महाराष्ट्र शासनाच्या अनेक समितींसोबत त्यांनी काम केले आहे.

**डॉ. नंदिनी देशमुख** या तीन दशके कीर्ती महाविद्यालयात प्राणिशास्त्र प्राध्यापिका म्हणून कार्यरत होत्या या काळात त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करून वैज्ञानिक आणि संशोधनावर आधारित आजीविका निवडण्यास मार्गदर्शन केले. त्या 'महाराष्ट्राची सागरी मत्स्यसंपत्ती' या कै. डॉ. डी. व्ही. बाळ यांच्या पुस्तकाच्या सह-लेखिकाही आहेत जे 'साहित्य संस्कृती मंडळ' यांद्वारे १९९३ मध्ये प्रकाशित करण्यात आले. सध्या त्या क्लायमेट रिॲलिटी फाउंडेशन या संस्थेत राष्ट्रीय समन्वयक - शिक्षण या ऐच्छिक पदावर कार्यरत आहेत.


मासे
जाणून
घेऊया
डॉ. विनय देशमुख
डॉ. नंदिनी देशमुख

